# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.

Web Site:- www.rdtenagpur.org.in E-mail: ronagpur.dte@ gmail.com

दुरध्वनी क्रं.-२५६५१४३ फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३

क्रमांक :- तंशिस/प्राकाना/शैवि-२/इबीसी/२०१३/ 3918

दिनांक:- 20 NOV 2013

प्रति,

संचालक/प्राचार्य,

खाजगी विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित,

पदवी, पदविका व पदव्युत्तर तस्सम संस्था,

नागपूर विभाग, नागपूर

विषय :- खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थामधील आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यांत येत असलेल्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपुर्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी ऑनलाईन प्रणाली चालू ठेवण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई, यांचे पत्र क्रं. १५/अर्थसं/इबीसी/ऑफलाईन/मुदतवाढ/२०१३/१४३, दि. १९ नोव्हेंबर २०१३ रोजीचे.

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थेमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ५० टक्के फी प्रतीपूर्ती करण्याबाबत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून ऑनलाईन प्रक्रिया राबविण्यांत आलेली आहे. सदर प्रक्रियेची मुदत दि. २१ ऑक्टोबर २०१३ पर्यंत देण्यांत आलेली होती. तथापि ज्या विद्यार्थ्यांचे अॅप्लीकेशन आय.डी. उपलब्ध नाही अथवा अन्य कारणाने त्यांचे अर्ज भरले गेले नाही. याबाबत संस्थेकडून विद्यार्थ्यांचे इबीसी अर्ज वरील मुदतीत भरणे शक्य झाले नाही. **अशा विद्यार्थ्यांचे अर्ज संकेतस्थळावर भरण्यासाठी दि. २५ नोव्हेंबर २०१३ ते २९ नोव्हेंबर २०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यांत येत आहे.** त्यानंतर कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नाही.

तसेच या योजनेपासून कुठलाही पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनी वंचित राहणार नाही याची दक्षता संस्था प्रमुख या नात्याने प्राचार्यांनी घ्यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.